# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
# राज्य सेवा मुख्य परीक्षा-२०१७
# (जाहिरात क्रमांक ५५/२०१७)
# घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दि. १६, १७ व १८ सप्टेंबर, २०१७ रोजी घेण्यात आलेल्या राज्य सेवा मुख्य परीक्षा-२०१७ च्या एकूण ३७७ पदांचा अंतिम निकाल संबंधित उमेदवारांनी अर्जात केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने त्यांची पात्रता शासन स्तरावर मुळ प्रमाणपत्रांवरुन तपासण्याच्या अधिन राहून दि.३० मे, २०१८ रोजी जाहीर करण्यात झाला आहे.

२. सदर परीक्षेमध्ये जळगाव जिल्हयातील श्री. राजपूत रोहितकुमार राजेंद्रसिंह (बैठक क्रमांक MB001059) हे राज्यातून प्रथम आले आहेत व सोलापूर जिल्हयातील श्री नष्टे अजयकुमार कल्याण (बैठक क्रमांक PN002429) हे मागास वर्गवारीतून राज्यातून प्रथम आले आहेत. तसेच महिला वर्गवारीतून पुणे जिल्हयातील श्रीमती न-हे रोहिणी दत्तात्रय (बैठक क्रमांक PN006185) हया राज्यातून प्रथम आल्या आहेत.

३. उमेदवारांच्या माहितीसाठी प्रस्तुत निकाल व प्रत्येक प्रवर्गाकरिता शिफारसपात्र ठरलेल्या शेवटच्या उमेदवाराचे गुण (cut off marks) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.

४. राज्य सेवा (पूर्व) परीक्षा-२०१७ दि. २ एप्रिल, २०१७ रोजी मुबंईसह अन्य ३७ जिल्हाकेंद्रावर घेण्यात आली होती. प्रस्तुत परीक्षेच्या पूर्व परीक्षेकरिता १९८५९९ उमेदवारांना प्रवेश देण्यात आला होता. सदर परीक्षेमधून राज्य सेवा (मुख्य) परीक्षेकरिता ४८३९ उमेदवार अर्हताप्राप्त ठरले होते. प्रस्तुत मुख्य परीक्षा दि.१६, १७ व १८ सप्टेंबर, २०१७ रोजी मुंबई, औरंगाबाद, नागपूर व पुणे येथे घेण्यात आली होती. लेखी परीक्षेच्या निकालांच्या आधारे मुलाखतीसाठी ११९४ उमेदवार अर्हताप्राप्त ठरले.

५. अर्जात प्रविण्य प्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडूचा दावा केलेल्या उमेदवारांनी, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक १ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार व त्यास अनुसरून प्रसिध्द करण्यात आलेल्या दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या शुध्दपत्रकातील तरतूदीनुसार आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार विषयांकित गट-ब (अराजपत्रित) पदासाठी निश्चित केलेल्या क्रीडा विषयक अर्हता धारण करत असल्याबाबतचा, पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक ३ जानेवारी, २०१७ रोजीचे किंवा तत्पूर्वीचे क्रीडा प्रमाणपत्र व मुख्य परीक्षेचा अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांकाचा म्हणजेच दिनांक ८ ऑगस्ट, २०१७ रोजीचा किंवा तत्पूर्वीचा संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालकांचा, क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीबाबतच अहवाल नियुक्तीपूर्वी सादर करणे अनिवार्य राहिल.

६. शिफारसपात्र ठरलेल्या विकलांग उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रंमाक अप्रकि-२०१२/प्र.क्र.२१७/आरोग्य-६, दिनांक ६ ऑक्टोबर, २०१२ मधील आदेशानुसार SADM या नविन संगणक प्रणालीव्दारे वितरीत करण्यात आलेल्या नवीन नमुन्यातील विकलांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहिल.

७. प्रस्तुत परीक्षेचा निकाल समांतर आरक्षणाच्या मुद्दयांसंदर्भात विविध मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील व W.P. No. 4159/2018, W.P. No. 4501/2018 व W.P.No. 4500/2018 वरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

८. प्रस्तुत अंतिम निकालात शिफारसपात्र न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे. अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईल मध्ये पाठविण्याच्या दिनांकापासून १० दिवसांत, आयोगाकडे ऑनलाईन पध्दतीने विहित नमुण्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (कृपया आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचनेतील सूचना क्रमांक ३.८ पहावे.)

दिनांक: ३० मे, २०१८
ठिकाण : मुंबई

विजया पडते
उपसचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग